# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० - E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १२/१०/२०१८

## मालेगाव शहरात जबरी लुटमार करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

मालेगाव शहरात गेल्या काही दिवसांपासुन मोटर सायकलवर भरधाव वेगाने येवुन जबरीने लुटमार करणारे ०३ ते ०४ इसमांची टोळी सक्रिय झाली होती, त्यामुळे सामान्य नागरीक, नोकरदार तसेच व्यापारी वर्गामध्ये घबराहटीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढते जबरी चोरीचे गुन्हयांना आळा बसावा यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**, व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. निलोत्पल सो.** यांनी जिल्हयातील मालाविरूध्दचे नाउघड गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन सराईत गुन्हेगारांची माहिती घेतली व गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचा **मालेगाव कॅम्प पोलीस ठाणेकडील I गुरनं ८१/२०१८ भादवि कलम ३९४,३४** या गुन्हयाचा समांतर तपास सुरू होता. सदर गुन्हयात अज्ञात ०३ आरोपीतांनी दिनांक ०७ सप्टेंबर २०१८ रोजी रात्रीचे सुमारास एका काळे रंगाचे बनावट नंबरप्लेट असलेले मोटर सायकलवर भरधाव वेगाने येवुन ईदगाह मैदान परिसरात फिर्यादी श्री.अबरार अन्सारी सकरूल्ला अन्सारी, रा. बादशहा खान नगर, मालेगाव यांना ''यहॉं क्या कर रहा है, पोलीस स्टेशन चल'' असे बोलुन बेदम मारहाण करून त्यांचेकडील मोबाईल फोन व रोख रूपये जबरीने हिसकावुन नेले होते.

दरम्यान सदर गुन्हयाचे समांतर तपासात दिनांक ११/१०/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात अज्ञात आरोपीतांचा शोध घेत होते. स्थागुशाचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांची गुन्हा करण्याची पध्दत तसेच गुन्हयात वापलेली बनावट नंबर प्लेट असलेली मोटर सायकल याबाबत गुप्त बातमीदारामार्फत माहिती घेवुन पथकास कसोशिने तपास करणेबाबत सुचना दिल्या, त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मालेगाव शहरातील सर्व्हे नं. ५५, गायकवाड चौक परिसरात रात्रभर सापळा रचुन **संशयीत नामे <u>१) आशिष रमेश पगारे</u>**, वय २०, रा. साने गुरूजी नगर, मालेगाव, **<u>२) संदिप मुकूंद महाले</u>,** वय २१, रा. गायकवाड चौक, मालेगाव, **<u>३) आकाश कैलास जवराज</u>**, वय २२, रा. गायकवाड चौक, मालेगाव यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांना पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी गेल्या महिन्यात ईदगाह मैदान परिसरात एका इसमास बेदम मारहाण करून त्याचे कब्जातुन मोबाईल फोन व रोख रूपये जबरीने लुटमार केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीतांचे कब्जातुन वरील गुन्हयात जबरीने हिसकावुन नेलेला **१२ हजार रू.** किं.चा **सॅमसंग जे ७ डयुओ मोबाईल फोन**, रोख रूपये व गुन्हयात बनावट नंबरप्लेट लावुन वापरलेली **काळे रंगाची होण्डा युनिकॉर्न** मोटर सायकल असा **एकुण ६५,०००/- रू.चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे. यातील आरोपी संदिप महाले याचेविरूध्द मालेगाव छावणी पोलीस ठाणेस दुखापतीचा गुन्हा दाखल असुन त्याने व त्याचे साथीदारांनी मालेगाव शहरात अजुन काही गुन्हे केले असल्याची शक्यता आहे. सदर आरोपी व जप्त मुद्देमाल गुन्हयाचे पुढील तपासकामी मालेगाव कॅम्प पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सहा.पोलीस निरिक्षक **श्री. संदिप दुनगहू,** सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा वसंत महाले, राजु मोरे, सुहास छत्रे, सुनिल पानसरे, पोना राकेश उबाळे, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने मालेगाव शहरातुन ०३ आरोपीतांना ताब्यात घेवुन जबरी लुटमारीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.